सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

(सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-३४)

# पुलगाव कॉटन मिल्स लिमिटेड (शेअर्सचे संपादन) अधिनियम, १९८२

( दिनांक २६ जानेवारी २०१६ पर्यंत सुधारित )

**Maharashtra Act No. XXXIV of 1982**

# The Pulgaon Cotton Mills Limited (Acquisition of shares) Act, 1982

*(As Modified upto 26th January 2016)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, वाई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२०१६

(किंमत रु. २३·००)

# पुलगाव कॉटन मिल्स लिमिटेड (शेअर्सचे संपादन) अधिनियम, १९८२

## अनुक्रमणिका


उद्देशिका. पृष्ठे

कलमे.

### प्रकरण एक
#### प्रारंभिक

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव व प्रारंभ. | ... | ... | २ |
| २. | व्याख्या. | ... | ... | २ |

### प्रकरण दोन
#### कंपानीच्या शेअर्सचे संपादन

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | कंपनीच्या शेअर्सचे हस्तांतरण व ते राज्य शासनाकडे निहित होणे. | ... | ... | ३ |
| ४. | रकमांचे प्रदान. | ... | ... | ३ |
| ५. | अधिदान आयुक्ताची नेमणूक. | ... | ... | ४ |
| ६. | आयुक्तास राज्य शासनाकडून प्रदान. | ... | ... | ४ |
| ७. | आयुक्ताकडे करावयाचे दावे. | ... | ... | ४ |
| ८. | दाव्यांची तपासणी. | ... | ... | ४ |
| ९. | दावे मान्य करणे किंवा ते नाकारणे. | ... | ... | ५ |
| १०. | आयुक्ताने दावेदारांना पैशाचे संवितरण करणे. | ... | ... | ६ |
| ११. | संवितरित झालेली किंवा दावा न केलेली रक्कम सर्वसाधारण महसुली लेख्यात जमा करणे. | ... | ... | ६ |
| १२. | तपासणी करण्याचा अधिकार. | ... | ... | ६ |
| १३. | रकमेच्या संबंधातील विवादात चौकशी करण्याचा आयुक्ताचा अधिकार. | | ... | ६ |

# अनुक्रमणिका

| कलमे. | | पृष्ठे |
|---|---|---|
| १४. | रक्कम न्यायालयात जमा करणे. ... ... | ७ |

## प्रकरण तीन
### संकीर्ण

| | | |
|---|---|---|
| १५. | अधिनियमाचा अधिभावी प्रभाव असणे. ... ... | ७ |
| १६. | शास्ती. ... ... | ७ |
| १७. | कंपन्यांनी केलेले अपराध. ... ... | ७ |
| १८. | अपराधाची दखल घेण्याबाबतची मर्यादा. ... ... | ८ |
| १९. | नियम करण्याचा अधिकार. ... ... | ८ |
| २०. | अडचणी दूर करण्याचा अधिकार. ... ... | ८ |
| २१. | निरसण व व्यावृत्ती. ... ... | ८ |

# सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक—३४[१]

## [पुलगाव कॉटन मिल्स लिमिटेड (शेअर्सचे संपादन) अधिनियम, १९८२]

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १४ ऑक्टोबर १९८२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

**पुलगाव कॉटन मिल्स लिमिटेड यांच्या कामकाजाचे सुयोग्य व्यवस्थापन सुनिश्चित करण्याच्या आणि सर्वसाधारण जनतेच्या जीवनविषयक गरजा असलेल्या महत्त्वाच्या वस्तूंचे उत्पादन चालू ठेवण्याच्या व त्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने, उक्त गिरणीच्या शेअर्सचे संपादन करण्याची, तसेच त्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** मेसर्स पुलगाव कॉटन मिल्स लिमिटेड, ५९, अपोलो स्ट्रीट, मुंबई, ही तिच्या, वर्धा जिल्ह्यातील पुलगाव येथे असणाऱ्या गिरणीमध्ये सर्वसाधारण जनतेच्या जीवनविषयक गरजा असणाऱ्या सुती कापडाची निर्मिती व उत्पादन करीत असते;

१९५१ चा ६५. **आणि ज्याअर्थी,** केंद्र सरकारने आपली अधिसूचना, उद्योग मंत्रालय (औद्योगिक विकास विभाग) क्रमांक एसओ. ७५३ (ई)/१८ एए/आयडीआरए/७६, दिनांक २५ नोव्हेंबर १९७६ अन्वये, औद्योगिक (विकास व नियमन) अधिनियम, १९५१ याच्या कलम १८ एए अन्वये, हा औद्योगिक उपक्रम व्यवस्थापनासाठी ताब्यात घेतला आहे;

**आणि ज्याअर्थी,** हा उपक्रम संपूर्णपणे वर्धनक्षम युनिट व्हावा यासाठी मोठ्या प्रमाणावरचे आधुनिकीकरण कार्यक्रम आखण्यात आले आहेत आणि ज्याअर्थी स्टेट बँक ऑफ इंडिया व वित्तीय संस्था यांनी या कंपनीला बऱ्याच मोठ्या रकमा दिलेल्या आहेत आणि वित्तीय संस्थांनी आधुनिकीकरण कार्यक्रमांसाठी मंजूर केलेल्या कर्जापैकी महत्त्वाच्या भागासाठी राज्य शासनाने हमी दिलेली आहे;

**आणि ज्याअर्थी,** राज्य शासनाने देखील या युनिटासाठी रु. २५.०० लाख एवढी रक्कम दिलेली आहे;

**आणि ज्याअर्थी,** या उद्योगामध्ये उत्पादन प्रमाण व रोजगार पातळी कायम ठेवणे आवश्यक आहे;

**आणि ज्याअर्थी,** या उद्योगातील उपक्रमांचे उत्पादन कायम ठेवणे व त्याचा विकास करणे आणि या उद्योगाच्या कामकाजाचे सुयोग्य व्यवस्थापन होईल याची निश्चिती करण्यासाठी आणखी मोठ्या रकमा गुंतवणे आवश्यक आहे;

**आणि ज्याअर्थी,** शासनाला पूर्वोक्त गुंतवणुका करणे शक्य व्हावे म्हणून लोकहिताच्या दृष्टीने राज्य शासनाने, कंपनीच्या कारभारावर परिणामकारक नियंत्रण ठेवण्याकरिता कंपनीच्या शेअर्सचे संपादन करणे आवश्यक आहे;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** पूर्वोक्त प्रयोजनांसाठी कायदा करण्याकरिता तात्काळ कृती करणे आवश्यक आहे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राचे राज्यपाल यांची खात्री झाली होती; आणि म्हणून त्यांनी पुलगाव कॉटन मिल्स लिमिटेड (शेअर्सचे संपादन) अध्यादेश, १९८२ हा २४ ऑगस्ट १९८२ रोजी

१९८२ प्रख्यापित केला होता;

चा महा. **आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे;

अध्या. ११. **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या तेहतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, महाराष्ट्र शासन राजपत्र, १९८२, भाग पाच, असाधारण (इंग्रजी) पृष्ठे २४३-२५४ पहा.

## प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, पुलगाव कॉटन मिल्स लिमिटेड (शेअर्सचे संपादन) अधिनियम, १९८२ असे म्हणता येईल.

(२) तो २४ ऑगस्ट १९८२ रोजी अमलात आल्याचे समजण्यात येईल.

व्याख्या. **२.** या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, —

(अ) "नेमलेला दिवस", म्हणजे, या अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख;

(ब) "बँक", म्हणजे, बँक व्यवसाय नियमन अधिनियम, १९४९ याच्या अर्थानुसारची बँक व्यवसाय करणारी कंपनी; १९४९ चा १०.

(क) "आयुक्त" म्हणजे, कलम ५ खाली नेमलेला अधिदान आयुक्त;

(ड) "कंपनी" म्हणजे, जी कंपनी अधिनियम, १९५६ याच्या अर्थानुसारची कंपनी असून जिचे नोंदणीकृत कार्यालय महाराष्ट्र राज्यामध्ये ५६, अपोलो स्ट्रीट, मुंबई ४०० ०२३ येथे आहे अशी मेसर्स पुलगाव कॉटन मिल्स लिमिटेड. १९५६ चा १.

(ई) "शेअर" म्हणजे, कंपनीच्या भांडवलातील शेअर आणि त्यामध्ये, कोणत्याही भागधारकाने कोणत्याही बँकेकडे किंवा अन्य धनकोकडे तारण ठेवलेल्या शेअरचा समावेश होतो;

(फ) "भागधारक" म्हणजे, —

(एक) नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी कंपनीने कोणत्याही शेअरचा धारक म्हणून नोंदलेली व्यक्ती आणि त्यामध्ये त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीचा समावेश होतो;

(दोन) ज्या व्यक्तीने, नेमलेल्या दिवसापूर्वी, कंपनीकडे, कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम १०८ अन्वये त्या कलमाच्या तरतुदींनुसार केलेला विहित नमुन्यात कोणत्याही शेअरच्या हस्तांतरणाचा रीतसर लेख दिलेला असेल अशी व्यक्ती; किंवा १९५६ चा १.

(तीन) जी व्यक्ती, कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम १०८ अन्वये विहित नमुन्यात कोणत्याही शेअरच्या हस्तांतरणासंबंधी केलेल्या रीतसर लेखान्वये दावा करील व असा रीतसर केलेला लेख, राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा तारखेपूर्वी, आयुक्ताच्या स्वाधीन करील अशी व्यक्ती; १९५६ चा १.

(ग) "विनिर्दिष्ट तारीख" म्हणजे, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीच्या प्रयोजनासाठी, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी तारीख आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींसाठी वेगवेगळ्या तारखा विनिर्दिष्ट करता येतील;

(ह) यामध्ये वापरलेल्या आणि व्याख्या न केलेल्या परंतु कंपनी अधिनियम, १९५६ मध्ये व्याख्या केलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना, त्या अधिनियमामध्ये नेमून दिलेले अर्थ अनुक्रमे असतील. १९५६ चा १.

## प्रकरण दोन

### कंपनीच्या शेअर्सचे संपादन

**३.** (१) नेमलेल्या दिवशी, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळ, स्टेट बँक ऑफ इंडिया किंवा भारताच्या आयुर्विमा महामंडळ यांसारख्या वित्त संस्थांनी धारण केलेले शेअर्स सोडून, कंपनीचे सर्व शेअर्स, या अधिनियमाच्या अर्थानुसार, राज्य शासनाकडे हस्तांतरित व निहित होतील. कंपनीच्या शेअर्सचे हस्तांतरण व ते राज्य-शासनाकडे निहित होणे.

(२) नेमलेल्या दिवशी व त्या दिवसापासून, राज्य शासन हे, पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या अर्थानुसार त्याजकडे हस्तांतरित व निहित झालेल्या प्रत्येक शेअरचा धारक म्हणून, कंपनीच्या सदस्य नोंदवहीमध्ये नोंदले गेल्याचे मानण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाकडे निहित झालेले सर्व शेअर्स, अशा निहितीकरणामुळे, मुक्त होतील व ते त्यांजवर परिणाम करणाऱ्या सर्व न्यासांपासून, दायित्वांपासून, बंधनांपासून, गहाणांपासून, भारांपासून, धारणाधिकारांपासून व इतर भारांपासून मुक्त असतील आणि अशा शेअरचा उपयोग कोणत्याही रीतीने निर्बंधित करणारा, न्यायालय, न्यायाधिकरण, किंवा इतर प्राधिकरण यांचा कोणताही आदेश, हुकूमनामा, जप्ती किंवा निषेधाज्ञा ही मागे घेण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(४) शंकानिवारणार्थ, याद्वारे, असे जाहिर करण्यात येत आहे की, पोट-कलमे (१) आणि (२) यांच्या तरतुदी पुढील गोष्टींवर परिणाम करत असल्याचे मानण्यात येणार नाही :—

(अ) भागधारकाने धारण केलेल्या शेअर्सच्या मूल्याचा पूर्ण किंवा कोणताही भाग त्याने कंपनीला दिलेला नाही किंवा कंपनीच्या खाती जमा केलेला नाही या कारणावरून किंवा इतर कोणत्याही कारणावरून, अशा भागधारकाकडून कोणतीही रक्कम वसूल करण्याचा, नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेला कंपनीचा कोणताही अधिकार; किंवा

(ब) कंपनीकडून येणे असलेला कोणताही लाभांश किंवा इतर प्रदान स्वीकारण्याचा, भागधारकाचा, कंपनीवर असणारा व नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी अस्तित्वात असणारा कोणताही अधिकार.

**४.** (१) कंपनीचे शेअर्स, कलम ३ अन्वये, राज्य शासनाकडे हस्तांतरित व निहित करण्यासाठी, राज्य शासनाकडून कंपनीच्या भागधारकांना प्रत्येक शेअरला चार रुपयेप्रमाणे रक्कम, रोख स्वरूपात व कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने, देण्यात येईल. रकमांचे प्रदान.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रकमेवर नेमलेल्या दिवशी सुरू होणाऱ्या व राज्य शासनाकडून अशी रक्कम आयुक्ताला प्रदान करण्यात येईल त्या तारखेला संपणाऱ्या मुदतीसाठी, वर्षाला ४ टक्के दराने सरळव्याज देण्यात येईल.

अधिदान आयुक्ताची नेमणूक.

५. (१) राज्य शासन, कलम ४ अन्वये कंपनीच्या भागधारकांना देय असलेल्या रकमांचे संवितरण करण्याच्या प्रयोजनास्तव, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अधिदान आयुक्ताची नेमणूक करील.

(२) आयुक्तास सहाय्य करण्यासाठी राज्य शासनास योग्य वाटेल अशा इतर व्यक्तींची नेमणूक करता येईल व त्यानंतर, या अधिनियमान्वये आयुक्तास ज्यांचा वापर करता येईल अशा सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यासाठी म्हणून आयुक्तास अशा एक अथवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना प्राधिकृत करता येईल आणि निरनिराळ्या अधिकारांचा वापर करण्यासाठी निरनिराळ्या व्यक्तींना प्राधिकृत करता येईल.

(३) आयुक्तास ज्यांचा वापर करता येईल अशा अधिकारांपैकी कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यासाठी म्हणून आयुक्ताकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणाही व्यक्तीस, जणू काही असे अधिकार हे अशा व्यक्तीला या अधिनियमाद्वारे थेट प्रदान करण्यात आलेले आहेत व प्राधिकृत करून ते तिला देण्यात आलेले नाहीत असे समजून या अधिकारांचा तशाच रीतीने व तेवढ्याच परिणामकारकपणे वापर करता येईल.

(४) आयुक्तांचे व या कलमान्वये नेमण्यात आलेल्या इतर व्यक्तींचे वेतन व भत्ते हे राज्याच्या एकत्रित निधीतून भागवण्यात येतील.

आयुक्तास राज्य शासना-कडून प्रदान.

६. (१) राज्य शासन, विनिर्दिष्ट तारखेपासून तीस दिवसांच्या आत, कंपनीच्या भागधारकांना देण्यासाठी म्हणून आयुक्ताकडे रोखीने पुढील रकमा देईल :—

(अ) कलम ४, पोट-कलम (१) यात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमेइतकी रक्कम, आणि

(ब) कलम ४, पोट-कलम (२) अन्वये निश्चित करण्यात आलेल्या रकमेइतकी रक्कम.

(२) राज्य शासन, राज्याच्या लोकलेख्यात आयुक्ताच्या नावे एक ठेव खाते उघडून देईल आणि या अधिनियमान्वये आयुक्ताला देण्यात येणारी प्रत्येक रक्कम त्याच्याकडून उक्त ठेव खात्यामध्ये जमा करण्यात येईल आणि उक्त ठेव खात्यातील पैशाचा व्यवहार आयुक्ताकडून करण्यात येईल.

(३) पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या ठेव खात्यात जमा असलेल्या रकमेवर उपार्जित होणारे व्याज कंपनीच्या भागधारकांच्या फायद्याकरिता वापरण्यात येईल.

आयुक्ताकडे करावयाचे दावे.

७. या अधिनियमाद्वारे संपादन करण्यात आलेल्या कोणत्याही शेअरच्या संबंधात दावा सांगणारा प्रत्येक भागधारक, विनिर्दिष्ट तारखेपासून तीस दिवसांच्या आत, आयुक्ताकडे, असा दावा सादर करील :

परंतु, तीस दिवसांच्या मुदतीत दावा सादर करण्यास दावेदारास प्रतिबंध होण्यास पुरेसे कारण होते याबाबत आयुक्ताची खात्री होईल त्या बाबतीत, आणखी तीस दिवसांच्या मुदतीत त्याला दावा दाखल करून घेता येईल; त्यानंतर नव्हे;

दाव्यांची तपासणी

८. कलम ७ अन्वये दावे मिळाल्यानंतर, आयुक्त प्रत्येक शेअरच्या संबंधात दाव्यांची तपासणी करील.

९. (१) दाव्यांची तपासणी केल्यानंतर, आयुक्त, ज्या तारखेस किंवा ज्या तारखेपूर्वी, प्रत्येक दावेदार आपल्या दाव्या दाखलचा पुरावा सादर करील, ती विवक्षित तारीख निश्चित करील. दावे मान्य करणे किंवा ते नाकारणे.

(२) आयुक्तास योग्य वाटेल अशा, इंग्रजी भाषेतील दैनिकाच्या एका अंकात, मराठी भाषेतील दैनिकाच्या एका अंकात आणि कोणत्याही अन्य प्रादेशिक भाषेतील दैनिकाच्या एका अंकात, जाहिरात देऊन, अशाप्रकारे निश्चित केलेल्या तारखेची, चौदा दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या दिवसांची नोटीस देण्यात येईल. आणि अशा प्रत्येक नोटिशीद्वारे, प्रत्येक दावेदाराला, जाहिरातीत विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत, आपल्या मागणीदाखलचा पुरावा आयुक्ताकडे सादर करण्याबद्दल सांगण्यात येईल.

(३) आयुक्ताने विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत आपल्या दाव्या दाखलचा पुरावा सादर करण्यास कसूर करील अशा प्रत्येक दावेदाराला, आयुक्ताने केलेल्या संवितरणातून वगळण्यात येईल.

(४) आयुक्त, त्याच्या मते आवश्यक होईल असा तपास केल्यानंतर आणि कंपनीला मागणीचे खंडन करण्याची संधी दिल्यानंतर व दावेदाराला त्याची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, लेखी स्वरूपात दावा पूर्णतः किंवा अंशतः मान्य करील किंवा तो नाकारील.

(५) तसेच आयुक्त जी रकमेची हक्कदार असेल अशा एक वा अनेक व्यक्तींसंबंधातील आणि कोणत्याही मृत दावेदाराचे कायदेशीर प्रतिनिधी कोण आहेत या संबंधातील कोणत्याही विवादाचा निर्णय देईल.

(६) आयुक्ताला, तो ज्या ठिकाणी आपल्या बैठकी घेईल ते ठिकाण किंवा ती ठिकाणे यांसह, आपली कामे पार पाडताना उद्भवणाऱ्या सर्व बाबींच्या संबंधात आपली स्वतःची कार्यपद्धती विनियमित करण्याचा अधिकार असेल आणि या अधिनियमान्वये तपास करण्याच्या प्रयोजनासाठी, दाव्याची न्याय्य चौकशी
१९०८ करताना पुढील गोष्टींच्या बाबतीत दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाकडे निहित
चा ५. असलेल्या अधिकारासारखेच अधिकार असतील :—

(अ) कोणत्याही साक्षीदाराला समन्स पाठविणे आणि त्याला उपस्थित राहण्यास भाग पाडणे व त्याची शपथेवर तपासणी करणे;

(ब) पुरावा म्हणून सादर करण्यायोग्य असेल असा कोणताही दस्तऐवज किंवा अन्य महत्त्वाची वस्तू शोधून काढणे आणि सादर करणे;

(क) शपथपत्रावर पुरावा स्वीकारणे;

(ड) साक्षीदारांच्या तपासणीसाठी कोणतेही आयोगपत्र काढणे.

१८६० (७) आयुक्तासमोरील कोणतीही तपासणी ही, भारतीय दंड संहितेच्या कलम १९३ आणि २२८
चा ४५. च्या अर्थांतर्गत न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल आणि आयुक्त हा, फौजदारी प्रक्रिया संहिता,
१९७४ १९७३ च्या कलम ३४५ आणि प्रकरण २६ यांच्या प्रयोजनासाठी दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.
चा २.

(८) आयुक्तांच्या निर्णयामुळे ज्यांचे समाधान झालेले नसेल अशा दावेदारांस, ज्यांच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमेत कंपनीचे नोंदलेले कार्यालय असेल अशा, मुंबई शहर दिवाणी न्यायालयाकडे, निर्णयाविरुद्ध अपील करता येईल.

आयुक्ताने दावेदारांना पैशाचे संवितरण करणे.

**१०.** (१) या अधिनियमान्वये एखादा दावा मान्य केल्यानंतर, या अधिनियमाच्या आधारे संपादन केलेल्या प्रत्येक शेअरसंबंधात देय असलेली रक्कम आयुक्ताकडून, प्रत्येक शेअरला चार रुपये या दराने ज्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना अशा रकमा देय असतील त्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना देण्यात येतील, आणि अशा प्रदानानंतर अशा प्रकारे संपादन केलेल्या शेअरसंबंधातील राज्य शासनाच्या दायित्वाची फेड झालेली असेल.

(२) तसेच आयुक्त, कलम ६, पोट-कलम (३) अन्वये त्याला व्याजाच्या स्वरूपात देण्यात आलेल्या रकमेचे भागधारकांमध्ये संविभाजन करील आणि असे संविभाजन हे प्रत्येक भागधारकाला देय असलेल्या रकमेच्या आधारावर करण्यात येईल.

संवितरित झालेली किंवा दावा न केलेली रक्कम सर्व-साधारण महसुली लेख्यात जमा करणे.

**११.** ज्या तारखेस आयुक्ताचे कार्यालय अंतिमतः परिसमापित करण्यात येईल त्या तारखेच्या लगत पूर्वीच्या तारखेस जिचे संवितरण झालेले नसेल किंवा जिच्याबाबत दावा करण्यात आलेला नसेल अशी आयुक्ताकडे देण्यात आलेली कोणतीही रक्कम, आयुक्ताकडून, त्याचे कार्यालय अंतिमतः परिसमापित होण्यापूर्वी, राज्य शासनाच्या सर्वसाधारण महसूली लेख्याकडे हस्तांतरित करण्यात येईल. परंतु अशा प्रकारे हस्तांतरित केलेल्या कोणत्याही रकमेबाबतचा दावा अशी रक्कम मिळण्याचा हक्क असलेल्या व्यक्तीकडून राज्य शासनाकडे सादर करता येईल. आणि जणू काही असे हस्तांतरण करण्यात आले नव्हते असे समजून, त्यासंबंधात कार्यवाही करण्यात येईल, दाव्याच्या प्रदानाचा आदेश, कोणताही असल्यास, महसुलाच्या परताव्याचा आदेश म्हणून समजण्यात येईल.

तपासणी करण्याचा अधिकार.

**१२.** या अधिनियमान्वये प्रदानावर हक्क सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस ती रक्कम मिळण्याचा हक्क आहे किंवा काय हे निश्चित करण्याच्या प्रयोजनांसाठी, आयुक्ताला —

(अ) कंपनीच्या कोणत्याही नोंदवहीचा किंवा अभिलेखाचा जिच्याकडे ताबा, अभिरक्षा किंवा नियंत्रण असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, अशी नोंदवही किंवा अभिलेख, आयुक्तासमोर, सादर करण्यास फर्मावण्याचा;

(ब) कोणत्याही व्यक्तीस, आयुक्तास आवश्यक वाटेल असे कोणतेही निवेदन करण्यास किंवा कोणतीही माहिती पुरविण्यास फर्मावण्याचा; अधिकार असेल.

रकमेच्या संबंधातील विवादात चौकशी करण्याचा आयुक्ताचा अधिकार.

**१३.** या अधिनियमान्वये देय असलेली कोणतीही रक्कम मिळण्याचा हक्क असेल अशा व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या संबंधात कोणताही विवाद (रकमेबाबत कोणत्याही मृत दावेदाराचे कायदेशीर प्रतिनिधी कोण आहेत या संबंधीचा कोणताही विवाद धरून) असेल त्या बाबतीत, आयुक्तास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, त्याला रक्कम मिळण्यास ज्या योग्य हक्कदार आहेत असे वाटेल अशा व्यक्तींना रकमेचे प्रदान करता येईल;

परंतु, रक्कम मिळण्याचा हक्क असणारी व्यक्ती कोण आहे हे ठरविण्यास आयुक्त असमर्थ असेल किंवा त्यास ती बाब दिवाणी न्यायालयाद्वारे अधिक योग्य प्रकारे हाताळली जाईल असे वाटत असेल तर, त्याला असा विवाद मुंबई शहर दिवाणी न्यायालयाकडे पाठवता येईल आणि त्यावरील त्या न्यायालयाचा निर्णय हा अंतिम असेल;

आणखी असे की, यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे या अधिनियमान्वये अनुज्ञेय रक्कम जिला पूर्णतः किंवा अंशतः मिळेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या, ती रक्कम मिळण्यास कायदेशीर हक्कदार असलेल्या व्यक्तीस ती देण्याच्या दायित्वावर परिणाम होणार नाही.

१४. आयुक्ताकडून कलम १३ अन्वये कोणताही विवाद मुंबई शहर दिवाणी न्यायालयाकडे पाठविण्यात आलेला असेल त्या बाबतीत, तो, उक्त रक्कम त्या न्यायालयात जमा करील. रक्कम न्यायालयात जमा करणे.

## प्रकरण तीन

### संकीर्ण

१५. या अधिनियमाचे उपबंध हे, या अधिनियमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कायद्यात, किंवा या अधिनियमाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कायद्याच्या आधारे अंमलात असलेल्या कोणत्याही लेखात एतद्‌विरुद्ध असे काहीही अंतर्भूत असले तरी, लागू होतील. अधिनियमाचा अधिभावी प्रभाव असणे.

१६. जर कोणतीही व्यक्ती — शास्ती.

(अ) तिला असा दावा खोटा आहे किंवा त्याला कोणताही आधार नाही असे माहीत असूनही किंवा तसे सकारण वाटत असूनही, या अधिनियमान्वये कोणत्याही रकमेबाबत कोणताही दावा करील; किंवा

(ब) या अधिनियमान्वये तसे करण्यास फर्मावण्यात आले असता,

(एक) कंपनीची कोणतीही नोंदवही किंवा अभिलेख सादर करणार नाही किंवा सादर करण्यास कसूर करील; किंवा

(दोन) कोणत्याही महत्त्वाच्या तपशीलाच्या बाबतीत खोटे असेल असे आणि जे खोटे असल्याचे त्याला माहीत असेल किंवा तसे विश्वासपूर्वक वाटत असेल किंवा खरे असल्याचे विश्वासपूर्वक वाटत नसेल असे कोणतेही निवेदन करील किंवा माहिती पुरवील; किंवा

(क) कोणत्याही पुस्तकात, लेख्यात, अभिलेखात, नोंदवहीत किंवा अन्य दस्तऐवजात उपरोक्तप्रमाणे कोणतेही निवेदन करील,

तर तिला, अपराधसिद्धीनंतर, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

१७. (१) या अधिनियमाखालील एखादा अपराध कंपनीने केलेला असेल त्याबाबतीत, अपराध घडला होता त्यावेळी कंपनीचा धंदा चालविण्यासाठी कंपनीची प्रभारी होती, आणि कंपनीला जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनी, अपराधादाखल दोषी, असल्याचे मानण्यात येईल आणि ती त्याबद्दल खटला भरला जाण्यास आणि त्यानुसार शिक्षा केली जाण्यास पात्र असेल; कंपन्यांनी केलेले अपराध.

परंतु, जर कोणतीही अशी व्यक्ती, अपराध तिच्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध करील तर, ती, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे कोणतीही शिक्षा केली जाण्यास पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील कोणताही अपराध जेव्हा कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा इतर अधिकाऱ्यांच्या संमतीने किंवा सहमतीने करण्यात आला असेल, किंवा त्यांच्या दुर्लक्षामुळे घडला असेल तेव्हा, असा संचालक,

व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी हा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध खटला भरला जाण्यास व तद्नुसार शिक्षा होण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(अ) "कंपनी" म्हणजे, कोणत्याही निगम निकाय, आणि त्यात भागीदारी संस्था किंवा व्यक्तीचा अन्य संघ यांचा समावेश होतो; आणि

(ब) "संचालक" म्हणजे, भागीदारी संस्थेच्या संबंधात, त्या भागीदारी संस्थेतील भागीदार.

अपराधाची दखल घेण्याबाबतची मर्यादा.

१८. कोणतेही न्यायालय, राज्य शासनाची किंवा राज्य शासनाने, त्या संदर्भात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याची पूर्वमंजुरी घेतल्याशिवाय, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाची दखल घेणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

१९. (१) राज्य शासनास, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी नियम करता येतील.

(२) ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून यथास्थिति अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अमलात येईल किंवा येणार नाहीत. तथापि, असे कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

२०. या अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप आदेश काढून, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु नेमलेल्या दिवसापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

निरसन व व्यावृत्ती.

२१. (१) दि पुलगाव कॉटन मिल्स लिमिटेड (शेअर्सचे संपादन) अध्यादेश, १९८२ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९८२ चा महा. अध्या. ११.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरी, उक्त अध्यादेशान्वये (काढलेला कोणताही नियम, आदेश किंवा अधिसूचना ही किंवा केलेली कोणतीही नेमणूक किंवा केलेले कोणतेही प्रत्यायोजन किंवा केलेला कोणताही दावा यासह) केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कार्यवाही ही या अधिनियमाच्या तत्सम उपबंधांन्वये यथास्थिति, केली असल्याचे, काढला असल्याचे किंवा केला असल्याचे मानण्यात येईल.

शा. मु. वाई –५ पानी २,५०० पु.–२-२०१६-एच-७८*

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**

  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई–४०० ००४.
  फोन : ०२२/२३६ ३२६ ९३, २३६ ३०६ ९५,
  २३६ ३११ ४८, २३६ ३४० ४९

- **व्यवस्थापक**

  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार,
  जी. पी. ओ. नजिक, पुणे–४११ ००१.
  फोन : ०२०/२६१ २५८ ०८, २६१ २८९ २०

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हील लाईन्स, नागपूर–४४० ००१.
  फोन : ०७१२/२५६ २६ १५, २५६ २८ १५

- **सहाय्यक संचालक**

  शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार
  पैठण रोड, रेल्वे स्टेशन,
  औरंगाबाद–४३१ ००१.
  फोन : ०२४०/२३३ १४ ६८, २३३ ११ ०९

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर–४१६ ००३.
  फोन : ०२३१/२६५ ०३ ९५, २६५ ०४ ०२

**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**